असा. क्र. १४ रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण
प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी २९, १९९६/माघ ९, शके १९१७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | पृष्ठे |
| **सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.**—महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी अधिनियम .. .. .. .. | ८४–८५ |

दिनांक २५ जानेवारी १९९६ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २९ जानेवारी १९९६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी अधिनियम.**

१९७१ चा महा. ४७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** आता, भारतीय गणराज्याच्या सेहेचाळिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

५८



संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने दुसऱ्यांदा मुदत वाढवणे) अधिनियम, १९९५ असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३० जून १९९५ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा. २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याचे कलम १, पोट-कलम (४) मध्ये " १९९५ " या आकड्यांऐवजी " १९९६ " हे आकडे करण्यात येतील. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती. ३. कोणत्याही व्यक्तीने, १ जुलै १९९५ रोजी सुरू होणाऱ्या आणि हा अधिनियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्या बाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे. ४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून १९९५ नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे, त्या दिनांकापासून दिनांक ३० जून १९९६ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढवण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधीनतेने अखंडपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई